# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ(पू),
मुंबई ४०० ०९८.

क. परीक्षा/कला निकाल कक्ष/९७९८/२०१७

**परिपत्रक :–**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, ऑक्टोबर/नोव्हेंबर, 2017 (द्वितीय सत्र 2017 मध्ये घेण्यात येणा–या कला शाखेच्या पदवी परीक्षेच्या खालील नमुद केलेल्या शिक्षणाक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in/portal या वेब लिंक वरून online घेण्यात येणार आहे.

1) M.A. Sem-I & III(CBSGS)/ (CBCS) (Reapeater/Fresh)
2) B.Ed. (2 years) (Sem-I) CBCS

वरील अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in/portal → Exam & Results → examination → Follow the instruction given on the page या वेब लिंक वरून online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.:–

| अ.क. | परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांने **online** अर्ज भरण्याची, **Inward** करण्याची व महाविद्यालयात त्याची प्रिंट सादर करण्याची तारीख | महाविद्यालयाने **form Submission Report** व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | २२/११/२०१७ ते ०८/१२/२०१७ | १२/१२/२०१७ पर्यंत |

पुढे संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशिलाप्रमाणे–संबंधीत विद्यार्थ्यांनी आपले परीक्षाअर्ज **mu.ac.in/portal**या संकेतस्थळावर **online** भरून त्याची प्रिंट घेऊन आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करावेत व संबंधीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी **online** भरलेले परीक्षाअर्ज आपल्या **Login** मध्ये **Inward** करून घ्यावेत व सदर **Inward**झालेल्या परीक्षाअर्जाचे **form Submission Report** काढून तो **Report** व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावेत. पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाहीत. तसेच परीक्षा अर्जाच्या प्रती **(Examination form Prints)** विद्यापीठाकडे पाठवू नयेत.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता (०८/१२/२०१७ रोजी सायं. ६ वा.) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षाअर्ज स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाही या बाबींची नोंद घेण्यात यावी.

परीक्षा प्रवेश अर्ज Inwardझाल्यानंतर कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, यामुळे परीक्षा अर्ज Inward करणापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत), विषय व इतर सर्व माहिती अचुक व बरोबर याची खात्री करून घ्यावी.

जे विद्यार्थी प्रथम सत्र २०१७ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झाले असतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल अश्या विद्यार्थ्यांचे द्वितीय सत्र २०१७ मध्ये होणा–या या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज **(Provisional Basis)** त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीत म्हणजेच संबंधीत परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विहीत शुल्कासहीत सादर करावेत. तसेच ज्यांचे निकाल राखीव ठेवण्यात आले आहेत आशा विद्यार्थ्यांनी सुध्दा परीक्षा अर्ज भरावेत.

ज्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र **online** पध्दतीने **Inward** होणार नाहीत व श्रेणी सुधारण्यासाठी असा विद्यार्थ्यांने आपले परीक्षा आवेदनपत्र पारंपारीक पद्धतीने ( **Hard Copy** स्वरुपात) वरील नमुद केलेल्या तारखांच्या वेळापत्रकाप्रमाणे भरुन विद्यापीठाकडे पाठवावेत.

(परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठी (देवनागरी) नाव टाकणे बंधनकारक आहे व तेच नाव त्यांच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. अन्यथा चूक झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.)

contd…2

# University of Mumbai



तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची संबधितांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(Web Link :- mu.ac.in/portal → Exam & Results → examination → follow the instructions given on the page)

18/11/17

स्थळ : मुंबई.
दि. 17नोव्हेंबर, 2017

(अर्जून घाटुळे)
स्था. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेशित

१ प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२ सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
३ सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र

ब. प्रत माहितीसाठी अग्रेशित

४ संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
५ मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-३२.
६ मा. प्र. कुलगुरू, मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियंत्रक यांचे स्विय सहायक